सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३३९ | मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १,५१,८००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १,४०,८००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १,१६,८००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,४००/-
भाव प्रती १० ग्राम

आजचे अभीष्टचिंतन






ॲड. सौ. रूपाली गवळे (बोरसे)
अमळनेर



प्रा. डॉ. नयना नवसारीकर
अमळनेर



श्री. योगेश ढवळे
फोटोग्राफर, अमळनेर



श्री. कैलास साळुंखे
पोलीस दल



श्री. गणेश महाजन
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!






अमळनेर : येथील अमळनेर महिला मंच ट्रस्टतर्फे सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी 'माहेरचा पारिजात' या उपक्रमाच्या समारोपप्रसंगी माहेरवाशिणींना माहेरची प्रेमळ भेट म्हणून पैठणी, फराळ आणि पारिजातकाचे रोप देताना अध्यक्षा सौ. कांचनताई शहा, उपाध्यक्षा सौ. तिलोत्तमाताई पाटील, सौ. सरोजताई भांडारकर, सचिव सौ. वसुंधराताई लांडगे व कोशाध्यक्षा प्रा. सौ. शीलाताई पाटील यांच्यासह कार्यकारी मंडळातील सदस्या. दुसऱ्या छायाचित्रात डोळ्यांत आठवणींचे अश्रू आणि चेहऱ्यावर माहेरच्या समाधानाचे हास्य घेऊन या अनोख्या उपक्रमाला भावनिक निरोप देण्यापूर्वी श्री मंगळग्रह मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ जमलेल्या माहेरवाशिणी. (छायाचित्रे : नितेश बारी)

# माहेरच्या आठवणींना पारिजाताचा सुगंध!

## 'माहेरचा पारिजात'चा भावपूर्ण समारोप; माहेरवाशिणींच्या ओटीत पैठणी, फराळ आणि प्रेमाची भेट

## पारिजातक रोपट्याच्या रूपाने जपली नात्यांची हिरवीगार व सुगंधी आठवण आणि भावूक होत घेतला निरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माहेर म्हणजे केवळ एक वास्तू नव्हे, तर आयुष्यभर मनाच्या कोपऱ्यात जपून ठेवलेली मायेची ऊब, आठवणींचा सुगंध आणि आपलेपणाची अखंड सावली. याच भावविश्वाला पारिजाताच्या सुगंधाची जोड देत अमळनेर महिला मंच ट्रस्टतर्फे श्री मंगळग्रह मंदिरात अमळनेरकर माहेरवाशिणींसाठी आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय 'माहेरचा पारिजात' या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचा सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी अत्यंत भावपूर्ण वातावरणात समारोप झाला.

समारोपप्रसंगी अमळनेर महिला मंच ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांकडून उपस्थित सर्व माहेरवाशिणींची पारंपरिक पद्धतीने ओटी भरून त्यांना माहेरची प्रेमळ भेट म्हणून पैठणी, फराळ आणि पारिजातकाचे रोप देण्यात आले. पैठणीच्या रूपाने माहेरची हळुवार आठवण, फराळाच्या रूपाने मायेची चव आणि पारिजाताच्या रोपाच्या रूपाने नात्याला सदैव हिरवे ठेवण्याचा संदेश अशा त्रिवेणी संगमाने या उपक्रमाचा निरोप सोहळा संस्मरणीय ठरला.

पारिजातकाचे रोप हातात घेताच अनेक माहेरवाशिणी भावूक झाल्या. 'माहेरची आठवण केवळ मनात नाही, तर अंगणातही फुलवायची' या भावनेतून त्यांनी पारिजातकाचे रोप लावून त्याचे पुढील दोन वर्षे मनापासून संगोपन करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे या उपक्रमाची सांगता ही केवळ एका कार्यक्रमाचा शेवट न ठरता माहेरच्या नात्यांना निसर्गाच्या माध्यमातून जपण्याचा नवा संकल्प ठरला. यानंतर सर्व माहेरवाशिणींनी एकत्रितपणे अल्पोपहाराचा आस्वाद घेतला. निरोपाची वेळ जवळ येताच एकमेकींना आलिंगन देत डोळ्यांत आठवणींचे पाणी आणि चेहऱ्यावर माहेरच्या समाधानाचे हास्य घेऊन त्यांनी या अनोख्या उपक्रमाला भावनिक निरोप दिला.

दरम्यान, 'माहेरचा पारिजात' उपक्रमासाठी मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे सलग तीन दिवस करण्यात आलेल्या सेवारूपी विशेष सहकार्याचे माहेरवाशिणींनी मनापासून कौतुक केले. आयोजनातील आपुलकी, सेवाभाव आणि प्रत्येक क्षणात जाणवणारी माहेरची ऊब यामुळे हा उपक्रम उपस्थितांच्या मनात कायमचा ठसा उमटवून गेला. माहेरची ओटी भरली, आठवणींची शिदोरी बांधली आणि अंगणात पारिजात रुजवला अशा भावस्पर्शी वातावरणात 'माहेरचा पारिजात'चा तीन दिवसीय प्रवास पूर्ण झाला. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी अमळनेर महिला मंच ट्रस्टच्या अध्यक्षा सौ. कांचनताई शहा, उपाध्यक्षा सौ. तिलोत्तमाताई पाटील, सौ. सरोजताई भांडारकर, सचिव सौ. वसुंधराताई लांडगे व कोशाध्यक्षा प्रा. सौ. शीलाताई पाटील व मंगळग्रह सेवा संस्थेचे सर्व विश्वस्त आणि सेवेकरी यांच्यासह कार्यकारी मंडळातील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.




अमळनेर : येथील अमळनेर महिला मंच ट्रस्टतर्फे रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी रात्री भुलाबाईची प्रतिमा स्थापन करून नाटिका सादरीकरणासह पत्रवाचन, शेकोटी कार्यक्रमात मका भाजण्याचा आनंद तसेच विविध गुणदर्शन कार्यक्रमांतर्गत नृत्य करताना माहेरवाशिणी तसेच कार्यक्रमाच्या आयोजक महिला.

# रुद्र महाभिषेकाने श्री मंगळग्रह मंदिरात भक्तीचा दरवळ!

## श्रावणानिमित्त आयोजन : श्री मंगळग्रह मंदिरातील पुरोहितांकडून सामूहिक रुद्र पूजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात आज सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी दुपारी तीन ते सायंकाळी पाच या वेळेत भक्तीमय आणि मंगलमय वातावरणात रुद्र महाभिषेक झाला. श्री मंगळग्रह मंदिराचे पुरोहित शुभम वैष्णव, जयेंद्र वैद्य, तुषार दीक्षित, मंदार कुलकर्णी, अक्षय जोशी, वैभव लोकांक्षी, हेमंत गोसावी, परशुराम शर्मा तसेच उमेश पाठक हे रुद्र महाभिषेक पूजेचे मानकरी होते. या सर्वांनी मंदिरातील श्री मंगळेश्वर महादेवांच्या पिंडीवर विधिवत सामूहिक रुद्र महाअभिषेकासह पूजा-अर्चा व बिल्वार्चना केली. भगवान महादेवांच्या उपासनेसाठी विशेष पवित्र मानल्या जाणाऱ्या श्रावणातील या धार्मिक विधीमुळे मंदिर परिसरात भक्तीमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी श्रावण मासानिमित्त रुद्र महाभिषेकाचे आयोजन केले जाते. यंदाही पारंपरिक धार्मिक विधींचे पालक करीत रुद्र महाभिषेक झाला.



*अमळनेर : श्रावण मासानिमित्त येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी भक्तीमय आणि मंगलमय वातावरणात श्री मंगळग्रह मंदिरातील पुरोहितांच्या शुभ हस्ते रुद्र महाभिषेक झाला.*

महादेवांच्या पिंडीवर जल, दुग्ध आदींच्या अभिषेकासह मंत्रोच्चार तसेच 'ओम नमः शिवाय' हा सामूहिक जप करण्यात आला. यावेळी भाविकांनी भगवान महादेवांचे दर्शन घेत पूजा-अर्चा केली.

हिंदू धर्मातील धार्मिक परंपरेत श्रावणात भगवान महादेवांची उपासना, रुद्र महाभिषेक, महामृत्युंजय जप आणि शिवस्मरण करण्याला अतिशय महत्त्व आहे. 'रुद्र' हे भगवान महादेवांचे उग्र स्वरूप मानले जाते. रुद्र महाभिषेकाच्या माध्यमातून शिवतत्त्वाचे स्मरण, अंतःकरणाची शुद्धी आणि आध्यात्मिक समाधान प्राप्त होते, अशीही भाविकांमध्ये श्रद्धा आहे. रुद्र महाभिषेकानंतर झालेल्या महाआरतीने सोहळ्याची सांगता झाली. याप्रसंगी झालेला घंटानाद, शंखनाद आणि मंत्रोच्चारांनी मंदिर परिसर दुमदुमला. उपस्थित भाविकांनी 'हर हर महादेव'चा जयघोष करीत आरतीत सहभाग नोंदविला.

रुद्र महाभिषेकाच्या पौरोहित्यावेळी पुरोहितांनीच ढोलकीवर भगवान महादेवांची स्तुती करणारी गीतेही म्हटली. या धार्मिक सोहळ्यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, विश्वस्त डी. ए. सोनवणे यांच्यासह मंगल सेवेकरी, भाविक व मंदिरातील सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शंभर लिटर दुधात १० लिटर भेसळयुक्त दूध!

## जानवे येथे 'एफडीए'-पोलिसांची संयुक्तिक कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील जानवे येथे दुधाचा फॅट वाढविण्यासाठी भेसळयुक्त दूध तयार करण्याचा कारखाना जळगावातील अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आणि पोलिसांनी उद्ध्वस्त केला आहे. हा भेसळीचा प्रताप करणारा महेश दिलीप पाटील (वय २७) याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी शुक्रवार, दि. ३० ऑगस्ट रोजी जळगावातील अन्न व औषध प्रशासन अधिकारी आकाश बोराडे यांना जानवे येथे भेसळयुक्त दूध तयार करण्याचा कारखाना सुरू असल्याचे कळविले. त्यानुसार कारवाईसाठी अधिकारी बोराडे आणि त्यांचे सहकारी ऋषभ चव्हाण, पोलीस निरीक्षक निकम, पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर, हवालदार काशिनाथ पाटील, सुनील तेली, विनोद संदानशीव, नितीन मनोरे, निलेश मोरे,

(पान २ वर)



**अमळनेर : तालुक्यातील जानवे येथे इंदापिंप्री रस्त्यावरील पत्रीशेडमध्ये दुधाचा फॅट वाढविण्यासाठी भेसळयुक्त दूध तयार करणाऱ्या महेश दिलीप पाटील याच्यावर कारवाई करताना जळगावातील अन्न व औषध प्रशासन विभागाचे कर्मचारी तसेच अमळनेर येथील पोलीस कर्मचारी.**

# श्री मंगळग्रह मंदिरात आज श्री सत्यनारायण महापूजा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रावणानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली आहे. या महापूजेचे विशेष मानकरी नगरसेवक अनिल महाजन ऊर्फ आबू दादा व त्यांच्या धर्मपत्नी सौ. निरांजनीताई महाजन यांच्या शुभ हस्ते सकाळी साडेआठच्या सुमारास या महापूजेची मंत्रच्चारासह विधिवत सुरूवात होईल.

मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी श्रावण मासानिमित्त श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन केले जाते. श्रावण मासातील भगवान विष्णूंच्या सत्यनारायण स्वरूपाची महापूजा करणे अतिशय पवित्र व पुण्यफल प्राप्तीचे मानले जाते. या काळात वातावरण पूर्णपणे सात्त्विक असते. त्यामुळे या पवित्र महापूजेवेळी शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासह तीर्थप्रसादासाठी सकाळी ९ वाजेपासून रात्री १० वाजेपर्यंत यावे, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेच्या विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## संपादकीय

### मर्जीशाहीला चाप

अनेक मंत्र्यांकडे सरकारच्याच विविध खात्यांमधून प्रतिनियुक्तीवर आलेले हे अधिकारी कोणते कौशल्य बाळगून असतात की सरकार बदलो वा मंत्री, त्यांची नावे मात्र कायम राहतात? बहुतांश मंत्र्यांचे स्वीय सहायक हे महसूल खात्यातील कर्मचारीच का असतात? मंत्रालयात मंत्र्यांच्या दालनात मिळेल ती जबाबदारी पार पाडण्याची संधी एकदा तरी मिळावी, या असंख्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या इच्छेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चाप लावला आहे. सरकारी कर्मचारी म्हणजे 'जनतेचे सेवक' हे प्राथमिक शाळेत 'सामुदायिक जीवन' या विषयात शिकलेले वाक्य प्रत्यक्षात खरे नसते, हे वय वाढल्यावर प्रत्येक नागरिकाला अनुभवाने समजते. त्यामुळे वर उल्लेखिलेली सरकारी कर्मचाऱ्यांची तीव्र इच्छा नक्की कोणत्या कारणामुळे असते, हे वेगळे सांगायला नको. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी अशा प्रकारे अन्य विभागांतून मंत्रालयात उसनवारी वा मौखिक तत्त्वावर आलेले अधिकारी व कर्मचारी यांनी तत्काळ आपल्या मूळ विभागात रुजू होण्याचे आदेश दिले आहेत. बहुतांश मंत्र्यांच्या दालनात अशा अत्यंत कामसू कर्मचाऱ्यांच्या झालेल्या नियुया या मंत्र्यांनी त्यांच्या मर्जीनुसार केलेल्या असतात. त्यामुळे एखादा प्रशासकीय अधिकारी इतक्या सगळ्या राजकीय नेत्यांचा रोष ओढवून घेण्याची हिंमत करेल, असे वाटत नाही. त्यामुळे ही हिंमत त्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडूनच मिळालेली असणार हे नक्की. फडणवीस यांचे या निर्णयासाठी कौतुकच करायला हवे. कारण राज्य कोणाचेही असो, मंत्र्यांचा पक्ष कोणताही असो, विचारधारा काहीही असो, वर्षानुवर्षे मंत्रालयात मंत्र्यांच्या दालनातील शिपायांपासून ते त्यांच्या स्वीय सहायकांची नावे पाहिली तर त्यातील सत्तर टक्के नावे तीच दिसतील.

काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीच्या पंधरा वर्षांच्या कार्यकाळात मंत्र्यांकडे असलेले स्वीय सहायक भाजपप्रणित आघाडीचे २०१४ पासून राज्य आले तरी मंत्रालयात कुठल्या ना कुठल्या मंत्र्यांकडे कसे चिकटले, या प्रश्नाचे उत्तर सगळ्यांना माहीत असले तरी त्यावरील उपाय सोपा नक्कीच नाही. 'महसूल'मधील कर्मचाऱ्याला जवळपास सगळ्याच सरकारी खात्यांच्या कारभाराची नीट माहिती असते. गावपातळीपासून सरकारी यंत्रणा कशी काम करते याचा अनुभव असतो. अनेकदा खात्याचे सचिव, प्रधान सचिव यांना एखादे करूनच घ्यायचे असे काम मंत्र्याला थेट सांगायचे नसते; अशा वेळी मध्यस्थ म्हणून महसूलचे अधिकारी अत्यंत कार्यकुशल समजले जातात. त्यामुळेच अशा कर्मचाऱ्यांना प्रत्येक मंत्र्याकडे मोठी मागणी असते. महसूल खात्यातील कर्मचारी मंत्र्यांचे स्वीय सहायक होतात याची संगती, ही व्यवस्था कशी चालते हे ज्यांना माहीत आहे, त्यांना लागू शकते. मात्र सरकारच्या पशुसंवर्धन खात्यात कार्यरत असलेल्या प्राण्यांच्या डॉक्टरांची विशेष कार्य अधिकारी (ओएसडी) म्हणून आपल्याकडे नियुक्ती करावी यासाठी पशुसंवर्धन खात्याकडे कित्येक मंत्री विनंत्या, अर्ज करत असतात. आता पशुसंवर्धन खात्यातला प्राण्यांच्या रोगांवर इलाज करणारा डॉक्टर मंत्र्याच्या कार्यालयात नक्की कोणते कार्य कुशलतेने पार पाडतो, या प्रश्नाचे उत्तर देणे थोडेसे कठीणच आहे.

फडणवीस यांनी २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाल्यावरच मंत्र्यांच्या स्वीय सहायक वा विशेष कार्य अधिकाऱ्यांच्या नेमणुकांबाबत कठोर भूमिका घेतली होती. मात्र पुढच्या निवडणुकीत उद्धव ठाकरेंचे सरकार आल्यावर गाडा पूर्वपदावर आला. एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर फडणवीस उपमुख्यमंत्री झाल्यावर या गाड्याची चाके ते रुळावर आणू शकले नव्हते; ती रुळावर आणण्यासाठी या कार्यकाळात त्यांनी सुरुवातीपासून कठोर धोरण अवलंबिले होते. मात्र, तीन पक्षांचे सरकार चालवताना असंख्य कुरबुरी व विविध राजकीय पेच-डावपेच लढवणे व सोडवणे यात मुख्यमंत्री व्यग्र असल्यामुळे अनेक मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या या भूमिकेकडे सोयिस्कर दुर्लक्ष केले होते. त्यामुळेच हा अधिकृत दट्ट्या देण्याचा निर्णय राज्याच्या मुख्य सचिवांना समोर ठेवून मुख्यमंत्र्यांनी घेतला असावा. वर उल्लेखिल्याप्रमाणे तीन पक्षांच्या सरकारात या निर्णयाला थेट कुणीही विरोध केला नाही, तरी यातून मोठी नाराजी निर्माण होईल, यात वाद नाही. भाजपांतर्गत नाराजी झाली तरी फडणवीस यांच्या विरोधात नाराजी व्यक्त करण्याची हिंमत असलेला एकही जण महाराष्ट्र भाजपत सध्या तरी नाही. मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या शिवसेनेचे मंत्री मर्जीशाहीला चाप लावणाऱ्या या नव्या निर्णयाला कसा प्रतिसाद देतात ते पाहावे लागेल.

# चोपडा रोडवर पुन्हा खड्ड्यांचे साम्राज्य; डांबरीकरण, खड्डे बुजविणे नावालाच!

## 'ग्लोबल महातेज'च्या वृत्तानंतर प्रशासनाकडून अर्धवट डागडुजी; खड्ड्यांवर टाकली बारीक खडी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील चोपडा रोडवरील शनीपेठ भागातील पेट्रोलपंपासमोरील रस्त्यावर सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रस्त्यावर आतापर्यंत वारंवार डागडुजी करण्यात आली आहे. मात्र, ती केवळ नावालाच अर्थात थातूरमातूर केली जाते. त्यामुळे या डागडुजीतून संबंधितांचे बिल निघण्यापलीकडे काहीही साध्य होत नाही.

काही दिवसांपूर्वी दै. 'ग्लोबल महातेज'ने या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत वृत्त प्रसिद्ध केले होते. त्यानंतर रस्त्याच्या एका बाजूचे डांबरीकरण करून काही खड्डे बुजविण्यात आले होते. मात्र, उर्वरित भाग तसाच सोडून देण्यात आला होता. आता उर्वरित खड्ड्यांमध्ये बारीक कचखडी टाकून ते बुजविण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु या कामाबाबतही नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. या रस्त्याचे कायमस्वरूपी काँक्रीटीकरण करण्यात यावे, अशी मागणी वाहनधारकांसह परिसरातील नागरीक करीत आहेत.

हा राज्य मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येतो. या मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. सदर रस्त्यावरून ये-जा करताना पादचारी व वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यात सांडपाणी व पावसाचे पाणी साचत आहे. खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने हा रस्ता धोकादायक बनला आहे.

### खड्डे बुजवले की वाहने घसरण्यासाठी कचखडी टाकली?

खड्डे बुजविण्यासाठी डांबराचा पातळ थर टाकण्यात आला आहे, तर काही ठिकाणी बारीक कचखडी टाकून काम आटोपते घेतले आहे. पाणी व वाहनांमुळे ही कचखडी रस्त्यावर सर्वत्र पसरली आहे. त्यामुळे अनेक दुचाकीस्वारांचे सदर रस्त्यावर अपघात होत आहेत. त्यामुळे दुचाकीस्वारांची वाहने घसरून (स्लीप) होऊन अपघात होत आहेत. त्यामुळे रत्यावरील खड्डे बुजविण्यासाठी कचखडी टाकली की वाहन धारकांची वाहने घसरण्यासाठी की त्यांचा जीव घेण्यासाठी टाकली आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. काही ठिकाणी केवळ बारीक कचखडी टाकून प्रशासनाने काम उरकले आहे. पाण्यामुळे ही खडी सैल होऊन रस्त्यावर पसरत असल्याने विशेषतः दुचाकीस्वारांना वाहन घसरून अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे.



*अमळनेर : येथील चोपडा रोडवर पुन्हा खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या खड्ड्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याऐवजी नुसतीच टाकण्यात येत असलेली बारीक कचखडी.*

### अवजड वाहनांच्या वाहतुकीचा परिणाम

या मार्गावरून दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. सततच्या अवजड वाहतुकीमुळे रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अत्यंत खराब होत आहे. त्यातच रस्त्याची योग्य देखभाल व वेळोवळी दुरुस्ती होत नसल्याने हा रस्ता दिवसेंदिवस अत्यंत जीवघेणा ठरतो आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

### कायमस्वरूपी दुरुस्तीची मागणी

महत्त्वाचा राज्य मार्ग असलेल्या अशा रस्त्याची दुरवस्था झालेली असताना सार्वजनिक बांधकाम विभाग एखादा मोठा अपघात किंवा जीवितहानी होण्याची प्रतीक्षा करीत आहे की काय? असा संतप्त प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सदर रस्त्याचे अत्यंत दर्जेदार व टिकाऊ निर्माणकार्य त्वरित सुरू करावे अन्यथा मोठे जनआंदोलन छेडावे लागेल, असा इशारा वाहनधारकांनी, परिसरातील नागरिकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# अहमदाबाद-प्रयागराज एक्स्प्रेसमध्ये 'हा' मोठा बदल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**२२ डब्यांची संरचना अशी**

- ३ वातानुकूलित द्वितीय श्रेणी (एसी-२ टियर)
- ७ वातानुकूलित तृतीय श्रेणी (एसी-३ टियर)
- ६ शयनयान श्रेणी (स्लीपर)
- ४ सामान्य द्वितीय श्रेणी
- १ द्वितीय आसन श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन
- १ जनरेटर कार

जळगाव : गुजरात, खानदेश आणि उत्तर प्रदेशदरम्यान प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी आहे. प्रवाशांची वाढती मागणी आणि सुविधा लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने अहमदाबाद-प्रयागराज एक्स्प्रेस सुधारित डब्यांच्या संरचनेसह कायमस्वरूपी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे या मार्गावरील प्रवाशांना विविध श्रेणींतील अधिक सुविधा उपलब्ध होणार असून, खानदेशातील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

रेल्वे प्रशासनाच्या निर्णयानुसार गाडी क्रमांक २२९६७ अहमदाबाद-प्रयागराज एक्स्प्रेस गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ पासून सुधारित डब्यांच्या संरचनेसह अहमदाबाद येथून सुटणार आहे. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक २२९६८ प्रयागराज-अहमदाबाद एक्स्प्रेस शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ पासून सुधारित संरचनेसह प्रयागराज येथून धावणार आहे. त्यामुळे दोन्ही दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सुधारित कोच संरचनेचा लाभ मिळणार आहे.

अहमदाबाद-प्रयागराज-अहमदाबाद एक्स्प्रेसच्या नव्या संरचनेत एकूण २२ डबे असणार आहेत. त्यामध्ये वातानुकूलित द्वितीय श्रेणीचे तीन डबे, वातानुकूलित तृतीय श्रेणीचे सात डबे, शयनयान श्रेणीचे सहा डबे, सामान्य द्वितीय श्रेणीचे चार डबे, द्वितीय आसन श्रेणीसह एक गार्ड ब्रेक व्हॅन आणि एक जनरेटर कारचा समावेश आहे. विविध श्रेणींतील डब्यांची उपलब्धता असल्याने वातानुकूलित तसेच शयनयान आणि सामान्य श्रेणीतील प्रवाशांना त्यांच्या गरजेनुसार प्रवासाचा पर्याय निवडता येणार आहे. विशेषतः वातानुकूलित तृतीय श्रेणीचे सात डबे असल्याने आरक्षित वातानुकूलित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा फायदा होण्याची शक्यता आहे.

**खानदेशात चार प्रमुख स्थानकांना थांबे**

अहमदाबाद आणि प्रयागराज या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणाऱ्या या रेल्वेसेवेला खानदेशातील प्रवाशांच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. या गाडीला दोन्ही दिशेने भुसावळ, जळगाव, अमळनेर आणि नंदुरबार या स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे. त्यामुळे खानदेशातील विविध भागांतील प्रवाशांना गुजरात तसेच उत्तर प्रदेशकडे जाण्यासाठी सोयीचा रेल्वे पर्याय उपलब्ध झाला आहे. जळगाव, भुसावळ, अमळनेर आणि नंदुरबार येथून अहमदाबाद तसेच प्रयागराजकडे प्रवास करणाऱ्या नागरिकांना या सेवेचा थेट लाभ मिळणार आहे. व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार तसेच धार्मिक आणि कौटुंबिक कारणांसाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी ही रेल्वे विशेष उपयुक्त ठरणार आहे

रेल्वे प्रशासनाने सुधारित संरचनेसह ही गाडी कायमस्वरूपी चालविण्याचा निर्णय घेतल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेषतः सणासुदीच्या काळात आणि सुटीच्या कालावधीत या मार्गावर प्रवाशांची संख्या वाढत असल्याने सुधारित डब्यांची रचना महत्त्वाची ठरणार आहे. गाडीच्या वेळा, स्थानकांवरील आगमन व प्रस्थानाची वेळ तसेच इतर तपशील जाणून घेण्यासाठी प्रवाशांनी प्रवासापूर्वी भारतीय रेल्वेच्या अधिकृत एनटीईएस संकेतस्थळावर किंवा एनटीईएस ॲपवर अद्ययावत माहिती तपासावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे. सुधारित संरचनेच्या तारखा लक्षात घेऊन प्रवाशांनी तिकीट आरक्षण आणि प्रवासाचे नियोजन करावे.



*अमळनेर : येथील फिनिक्स सोशल अवेरनेस ग्रुपतर्फे अमळनेर पोलीस ठाण्यात रक्षाबंधन कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित ग्रुपच्या अध्यक्षा ॲड. सौ. ललितताई पाटील, सदस्या सौ. वसुंधराताई लांडगे, डॉ. सौ. प्रतिभाताई मराठे, सौ. सुचितताई पाटील, सौ. लतताई पाटील यांच्यासमवेत अमळनेर उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम तसेच पोलीस बांधव.*

# फिनिक्स सोशल अवेरनेस ग्रुपतर्फे पोलीस ठाण्यात रक्षाबंधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीद जपत वर्षभर आपल्या संरक्षणासाठी दिवस-रात्र तत्पर व कटिबद्ध राहणाऱ्या पोलीस बांधवांचे आपल्या सामाजिक जीवनात फार मोलाचे योगदान आहे. आपल्या रक्षणामुळे त्यांना कुटुंबीयांसमवेत अतिशय कमी वेळ घालविण्यास मिळत असतो. त्यामुळे त्यांच्यासमवेत असलेले नाते यापुढेही अतूट राहावे, ही भावना जपत येथील फिनिक्स सोशल अवेरनेस ग्रुपतर्फे दरवर्षीप्रमाणे नुकताच अमळनेर पोलीस ठाण्यात रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

ग्रुपच्या अध्यक्षा ॲड. सौ. ललितताई पाटील यांच्यासह ग्रुप सदस्या सौ. वसुंधराताई लांडगे, डॉ. सौ. प्रतिभाताई मराठे, सौ. सुचितताई पाटील, सौ. लतताई पाटील यांनी पोलीस ठाण्यात अमळनेर उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम तसेच सर्व पोलीस बांधवांचे औक्षण करत त्यांच्या हाताला राखी बांधत हा सण साजरा केला. यावेळी ग्रुपमधील भगिनींच्या मायेने पोलीस बांधव भारावल्याचे पाहावयास मिळाले.



*अमळनेर : येथील नगरसेवक सचिन कासार ऊर्फ गोपीभाऊ यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना दै. 'ग्लोबल महातेज'चे मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी, ब्युरो चीफ रजनीकांत पाटील, रेडिओ मंगलध्वनीचे समन्वयक अजय पाटील, ऑपरेटर संजय सोनवणे.*

# शंभर लिटर दुधात १० लिटर भेसळयुक्त दूध!

**पान १ वरून**

सागर साळुंखे हे जानवे येथे इंदापिंप्री रस्त्यावर पोहोचून दुपारी साडेतीन वाजता त्यांनी एका पत्रीशेडमध्ये छापा घातला. त्या ठिकाणी महेश पाटील हा मिक्सरमध्ये भेसळयुक्त दूध तयार करताना आढळून आला. तो १० लिटर भेसळयुक्त दूध तयार करून ते शंभर लिटर गायीच्या दुधात फॅट वाढविण्यासाठी मिसळतो आणि दूध धुळे येथे विक्रीसाठी पाठवितो, असे त्याने पोलिसांना सांगितले.

पोलिसांनी त्याच्याकडून मिक्सर, सोयाबीन तेल, लोखंडी कॅन, गायीचे दूध व इतर साहित्य जप्त करून श्री. बोराडे यांच्या फिर्यादीवरून महेश याच्याविरुद्ध अन्न व सुरक्षा मानके अधिनियम २००६ चे कलम २६(१), २७(३) , ३१(१) , ३१(२) , ५९ सह भारतीय न्यायसंहिता २७४, २७५ , १२३,३१८ प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्यानंतर महेश पाटीलला अटक केली. हवालदार सुनील जाधव तपास करीत आहेत.

# सप्टेंबर २०२६ मध्ये सोन्याचे दर कसे असणार?

## नवा उच्चांक की मोठी घसरण होणार? जाणून घ्या तज्ज्ञांचा अंदाज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोन्याच्या दरात पुन्हा मोठी वाढ होण्यास सुरूवात झाली आहे. अवघ्या काही दिवसांमध्ये झालेल्या मोठ्या दरवाढीनंतर सोने तीन महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचले आहे. आता सप्टेंबरबाबत सर्वांत मोठा प्रश्न उपस्थित होत आहे, ही तेजी अशीच कायम राहणार की उच्च स्तरावर नफा वसुली पाहायला मिळणार? बाजारातील परिस्थिती आणि ग्रहांचे संकेत एकतर्फी तेजी ऐवजी मोठ्या चढ-उतारांचा महिना दाखवत आहेत.

### सोने सध्या कोणत्या पातळीवर आहे?

**आंतरराष्ट्रीय बाजार :** सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय बाजारात स्पॉट गोल्ड (हाजिर सोने) ४,६५० डॉलर प्रति औंसच्या पार पोहोचले. मे महिन्याच्या मध्यांतरानंतरची ही सर्वांत मोठी उच्चांकी पातळी होती. एकट्या गेल्या आठवड्यात सोन्याच्या दरात ५ टक्क्यांहून अधिक तेजी नोंदविली गेली.

**भारतीय बाजार (एमसीएक्स आणि आयबीजेए) :** दि. २४ ऑगस्ट रोजी एमसीएक्सवर सोने सुमारे एक लाख ६३ हजार ८७० रुपये प्रति १० ग्रॅमपर्यंत पोहोचले होते. तर आयबीजेएनुसार ९९९ शुद्धतेच्या सोन्याचा सकाळचा दर एक लाख ६२ हजार ६०३ रुपये प्रति १० ग्रॅम होता, तर सायंकाळचा दर एक लाख ६२ हजार १५४ रुपये राहिला. (या दरांमध्ये जीएसटी आणि मेकिंग चार्जेस समाविष्ट करण्यात आलेले नाहीत).

**घसरण :** दि. २५ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय बाजारात उच्च पातळीवरून किंचित घसरण झाली. सोने सुमारे ०.२ टक्क्यांनी घसरून ४,६४० डॉलरच्या आसपास आले. म्हणजेच तेजी मजबूत आहे, परंतु वरच्या पातळीवर बाजारात संकोचही दिसून येत आहे.

### सोन्याच्या दरात अचानक एवढी तेजी का आली?



या तेजीमागे केवळ सणासुदीची मागणी हेच एकमेव कारण नाही. यामागील मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत.

**कमकुवत डॉलर :** जागतिक बाजारात डॉलर कमकुवत झाल्याने इतर चलनांच्या तुलनेत सोने स्वस्त होते. ज्यामुळे सोन्याची मागणी वाढते.

**अमेरिकन कर्ज व बॉण्ड्स :** अमेरिकन सरकारची दीर्घकालीन बॉण्ड खरेदी वाढविण्याची योजना, ज्यामुळे डॉलर आणि सरकारी कर्जाबाबत चिंता वाढली आहे.

**भू-राजकीय तणाव :** अमेरिका-इराण तणाव आणि नवीन निर्बंध लादले जाण्याच्या शक्यतेमुळे सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याची मागणी वाढली आहे.

### पुढील आव्हाने कोणती?

आता बाजाराचे लक्ष अमेरिकेतील महागाईची आकडेवारी आणि फेडरल रिझर्व्हच्या भूमिकेकडे लागले आहे. महागाई वाढल्यास आणि व्याजदर उच्च ठेवण्याचे संकेत मिळाल्यास सोन्याच्या तेजीला धक्का बसू शकतो. सोन्यातून नियमित व्याज मिळत नसल्याने, बॉण्ड यील्ड वाढल्यास सोन्याची चमक काही काळासाठी फिकी पडू शकते. तसेच भारतात रुपया आणि डॉलरचा दर अत्यंत महत्त्वाचा राहील. आंतरराष्ट्रीय बाजारात सोने स्थिर राहिले तरी रुपया कमकुवत झाल्यास देशांतर्गत बाजारात सोन्याचे दर वाढू शकतात.

**सप्टेंबरमध्ये कसे असतील दर?**

सप्टेंबरमध्ये सोन्यातील मोठी तेजी पूर्णपणे संपताना दिसत नाही. तरीही ऑगस्टसारखी एकतर्फी वाटचाल पुन्हा होणे कठीण जाऊ शकते. महिन्याच्या सुरूवातीला आणि शेवटच्या टप्प्यात नफा वसुलीचा दबाव राहू शकतो. महिन्याच्या मधोमध पुन्हा एकदा मजबूती पाहायला मिळू शकते. एकंदरीत, सप्टेंबर महिन्यात सोन्याचे भाव उच्च पातळीवर टिकून राहू शकतात; परंतु या प्रवासात मोठी घसरण आणि पुन्हा रिकव्हरी दोन्ही पाहायला मिळेल. सोन्याची खरी दिशा अमेरिकेतील महागाई, फेडची भूमिका, डॉलर, बॉण्ड यील्ड, भू-राजकीय घडामोडी आणि रुपयाची हालचाल यावरच अवलंबून असेल.

### सराफ तज्ज्ञांचे काय मत आहे?

**तेजीचा अंदाज :** प्रसारमाध्यमे आणि मार्केट रिपोर्ट्सनुसार मध्यवर्ती बँकांची मागणी, अमेरिकेच्या कर्जाबाबतची चिंता, कमकुवत डॉलर आणि भू-राजकीय तणाव सोन्याच्या दराला पाठबळ देऊ शकतात. ४,७०० डॉलरच्या वर भाव टिकल्यास तेजीचा पुढील मार्ग मोकळा होऊ शकतो.

**खबरदारीचा इशारा (टीडी सिक्युरिटीज) :** टीडी सिक्युरिटीजचे मूल्यांकन सावध करणारे आहे. त्यांच्या मते सोने हे महागाईपासून संरक्षणाचे साधन बनले आहे, परंतु व्याजदरातील वाढ या तेजीला रोखू शकते. सध्या खूप मोठ्या लक्ष्यापर्यंत त्वरित पोहोचण्याची अपेक्षा करणे घाईचे ठरेल.

**एकंदरीत निष्कर्ष :** तज्ज्ञांच्या मते तेजीचा पाया मजबूत आहे; मात्र या उच्च पातळीवर मोठ्या घसरणीपेक्षा आधी नफा वसुली आणि नंतर नवीन दिशा निश्चित होण्याची शक्यता जास्त आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिंगबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# सरकारी स्कूल से पढ़ी लड़की बनी आयएएस, आज है जिला कलेक्टर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अक्सर ऐसा माना जाता है कि केवल बड़े और महंगे प्राइवेट स्कूलों में पढ़कर ही बड़े पदों पर पहुंचा जा सकता है। लेकिन इस सोच को पूरी तरह से झुठलाते हुए आयएएस अधिकारी जयश्री जैन ने अपनी कड़ी मेहनत के दम पर सफलता का ऐसा मुकाम हासिल किया है, जिस पर आज छत्तीसगढ़ और राजस्थान दोनों ही राज्यों को गर्व महसूस हो रहा है। छत्तीसगढ़ सरकार ने आईएएस जयश्री जैन को सक्ती जिले का नया कलेक्टर नियुक्त किया है।

### राजस्थान और छत्तीसगढ़ से नाता

२१ फरवरी १९७९ को जन्मीं जयश्री जैन मूल रूप से राजस्थान के बीकानेर जिले के गंगाशहर की रहने वाली हैं। वे तोलाराम मालू की बेटी और मालचंद मालू की बहू हैं। उनका परिवार कई दशक पहले छत्तीसगढ़ के सूरजपुर जिले के विश्रामपुर में आकर बस गया था। वर्तमान में वे अपने सीए पति जयंत के साथ रायपुर में रहती हैं।

**सक्सेस स्टोरी**

### सरकारी स्कूल से शिक्षा की शुरुआत और टॉप यूनिवर्सिटी रैंक

जयश्री जैन की शुरुआती पढ़ाई विश्रामपुर के एक साधारण सरकारी स्कूल से हुई। स्कूल की पढ़ाई पूरी करने के बाद उन्होंने होली क्रॉस कॉलेज से उच्च शिक्षा प्राप्त की और कॉलेज में अपनी पढ़ाई के दौरान पूरी यूनिवर्सिटी में पहला स्थान हासिल किया।

अपनी ग्रेजुएशन की पढ़ाई पूरी करने के बाद वर्ष २००५ में वे राज्य प्रशासनिक सेवा में चयनित हुईं। इसके बाद अपनी बेहतरीन सेवाओं और प्रमोशन के दम पर वे वर्ष २०१६ बैच की आईएएस अधिकारी बनीं। जयश्री को सूरजपुर जिले से आईएएस बनने वाली पहली महिला होने का गौरव भी प्राप्त है।

### छात्रों के लिए प्रेरणा की मिसाल

जयश्री जैन का यह सफर देश के उन तमाम सरकारी स्कूलों के छात्रों के लिए एक बहुत बड़ी सीख है जो संसाधनों की कमी को अपनी बाधा मानते हैं। जयश्री की कहानी यह साबित करती है कि अगर आपके पास लगन, अनुशासन और मेहनत करने का जज्बा है, तो स्कूल चाहे कोई भी हो, आप कलेक्टर बनने जैसे देश के सबसे बड़े सपनों को भी हासिल कर सकते हैं।



### सफल प्रशासनिक कार्यकाल और नई जिम्मेदारी

आयएएस बनने के बाद जयश्री जैन ने कई महत्वपूर्ण पदों पर जिम्मेदारी संभाली है। वे वर्ष २०२१ में बिलासपुर की अपर कलेक्टर और वर्ष २०२५ में राज्य ग्रामीण आजीविका मिशन की मैनेजिंग डायरेक्टर के रूप में भी अपनी सेवाएं दे चुकी हैं। हाल ही में वन एवं जलवायु परिवर्तन विभाग में जॉइंट सेक्रेटरी पद पर तैनाती के बाद अब विष्णुदेव साय सरकार ने उन्हें सक्ती जिले के कलेक्टर पद की महत्वपूर्ण बागडोर सौंपी है।




# विमान आकाशात झेपावलेले असताना टॉयलेटचे पाणी नेमके जाते कुठे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विमानातील टॉयलेट फ्लश केल्यानंतर त्यातील कचरा थेट हवेत सोडला जात नाही.

**टँक :** हा कचरा विमानाच्या आत असलेल्या खास बंदिस्त वेस्ट टँकमध्ये जमा होतो.

**व्हॅक्यूम :** आधुनिक विमानांमध्ये फ्लशसाठी व्हॅक्यूम सिस्टमचा वापर केला जातो.

**आवाज :** फ्लश केल्यानंतर येणारा मोठा आवाज व्हॅक्यूम सिस्टीममुळे होतो.

**वेग :** व्हॅक्यूमच्या मदतीने कचरा पाइपमधून वेगाने वेस्ट टँकमध्ये खेचला जातो.

**पाणी :** विमानातील टॉयलेटमध्ये पारंपरिक टॉयलेटच्या तुलनेत खूप कमी पाणी वापरले जाते.

**सुरक्षा :** टॉयलेटमधील कचरा बाहेर पडू नये यासाठी संपूर्ण सिस्टम बंदिस्त ठेवली जाते.

**प्रवास :** विमान हजारो फूट उंचीवर असतानाही हा कचरा सुरक्षितपणे टँकमध्ये साठवला जातो.


**लँडिंग :** विमान जमिनीवर आल्यानंतर विशेष ग्राउंड सर्व्हिस वाहन टॉयलेटच्या वेस्ट सिस्टमला जोडले जाते.

**सफाई :** या वाहनाच्या मदतीने वेस्ट टँकमधील कचरा बाहेर काढून त्याची योग्य विल्हेवाट लावली जाते.

**सत्य :** त्यामुळे विमानाच्या टॉयलेटमधील कचरा आकाशातून खाली पडतो, ही समजूत चुकीची आहे.

# आकाशात लेझर लाइट का सोडू नये?

## हा कायद्याने गुन्हा का? जाणून घ्या यामागील कारण...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रात्रीच्या वेळी लेझर लाईट वापरणे ही एक सामान्य गोष्ट वाटत असली तरी तो एक फौजदारी गुन्हा आहे. एक शक्तिशाली लेझर किरण अनेक किलोमीटरचा प्रवास करू शकतो.

**अपघात :** यामुळे गंभीर अपघात होऊ शकतात. आकाशाकडे जाणारा लेझर किरण जमिनीपासून हजारो फूट उंचीवर उडणाऱ्या विमानांपर्यंत पोहोचू शकतो.

**अडथळा :** जर तो कॉकपिटमध्ये शिरला, तर तो वैमानिकाचे लक्ष विचलित करू शकतो. सुरक्षित उड्डाण कार्यात अडथळा आणू शकतो.

**तेजस्वी लेझर :** जेव्हा अंधाऱ्या कॉकपिटमध्ये अचानक एक तेजस्वी लेझर चमकतो, तेव्हा त्यामुळे क्षणिक अंधत्व येऊ शकते. वैमानिकांची दृष्टी तात्पुरती जाऊ शकते.

**धोकादायक :** त्यांना दृष्टिपथात तेजस्वी ठिपके आणि सावल्या दिसू शकतात. विमान टेक-ऑफ किंवा लँडिंग करत असताना लेझर घटना विशेषतः धोकादायक असतात.

**नियंत्रण :** याचे कारण असे, की वैमानिकांना दृष्टीवर अचूक नियंत्रण ठेवावे लागते. अगदी थोडासा विचलितपणासुद्धा विमानचालनासाठी गंभीर धोका निर्माण करू शकतो.

**प्रकाशित :** जरी लेझर किरण त्याच्या स्रोतापाशी अगदी लहान दिसत असला, तरी तो जसजसा पुढे जातो तसतसा हळूहळू मोठा होत जातो. विमानाच्या उंचीवरून पाहिल्यास जमिनीवरून दिसणाऱ्या भागापेक्षा प्रकाशित होणारा भाग खूपच मोठा असतो.

**प्रकाश :** विमानांच्या विंडशील्डवर सूक्ष्म भेगा, धूळ आणि ओरखडे पडण्याची शक्यता असते. जेव्हा लेझर काचेवर पडतो तेव्हा त्याचा प्रकाश कॉकपिटमध्ये पसरू शकतो.

**तीव्र झगमगाट :** या अचानक आलेल्या तीव्र झगमगाटामुळे वैमानिकाला लक्षणीय अस्वस्थता येऊ शकते. उच्च शक्तीच्या लेझर किरणांचा थेट संपर्क आल्यास डोळ्याच्या पडद्याला इजा पोहोचू शकते.

**अंधत्व :** गंभीर प्रकरणांमध्ये अति संपर्कामुळे कायमचे अंधत्व देखील येऊ शकते. विमानावर लेझर टाकणे किंवा त्याला धोका निर्माण होईल अशा प्रकारे त्याचा वापर करणे. यामुळे गंभीर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**निर्बंध :** भारत आणि इतर देशांमधील प्राधिकरणांनी अशा धोकादायक वर्तनासाठी निर्बंध आणि दंडात्मक तरतुदी केल्या आहेत.

**धोका :** अंधार, अंतर आणि प्रखर प्रकाश यांच्या एकत्रित परिणामामुळे धोका निर्माण होतो. जमिनीवरून येणारा प्रकाशाचा एक लहानसा बिंदूदेखील विमानाच्या कॉकपिटमध्ये एक मोठा दृश्य धोका बनू शकतो.

# ‘साप’ आणि ‘नाग’ एकच की वेगळे? गोंधळ दूर करा

## जाणून घ्या वैज्ञानिक फरक, ओळखण्याच्या सोप्या टिप्स आणि सुरक्षेचे उपाय!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशभरात ‘नागपंचमी’चा सण सर्वत्र साजरा केला जातो. आपण लहानपणापासूनच साप आणि नाग यांच्याबद्दल ऐकत आलो आहोत, पण ते एकच आहेत की वेगळे, याचा कधी विचार केला आहे का? लोक अनेकदा त्यांच्यात गोंधळतात. मात्र, जीवशास्त्रज्ञ आणि वन्यजीव तज्ज्ञांच्या मते प्रत्येक नाग हा साप असतोच, पण प्रत्येक साप हा नाग नसतो. भारतात आढळणाऱ्या सापांच्या शेकडो प्रजातींपैकी केवळ काहीच ‘नाग’ (कोब्रा) या श्रेणीत येतात. विशेषतः पावसाळ्यात घराच्या आसपास साप किंवा नाग अचानक दिसणे ही सामान्य बाब आहे. अशा वेळी घाबरून न जाता तो प्राणी किती धोकादायक किंवा विषारी आहे हे ओळखणे महत्त्वाचे असते.




**१) वैज्ञानिक आणि प्रजाती-आधारित फरक**

**साप :** ‘साप’ हा सरपटणाऱ्या प्राण्यांचा एक संपूर्ण गट आहे. यामध्ये बिनविषारी सापांपासून (जसे की अजगर आणि धामण) ते अत्यंत विषारी सापांपर्यंत (जसे की मण्यार आणि घोणस) सर्वांचा समावेश होतो.

**नाग :** ‘नाग’ हा विशेषतः ‘इलापिडे’ कुळातील ‘नाजा’ प्रजातीचा एक विषारी साप आहे. इंग्रजीत याला ‘कोब्रा’ असे म्हणतात. थोडक्यात सांगायचे तर, नाग हा सापांच्या व्यापक कुळातील एक वेगळा आणि अत्यंत विषारी सदस्य आहे.

**२) अचानक समोरासमोर आल्यास त्यांना कसे ओळखावे**

जर तुम्हाला अचानक एखादा साप दिसला, तर काही विशिष्ट लक्षणांवरून तो नाग आहे की इतर सामान्य साप, हे तुम्ही ओळखू शकता.

**फणा काढणे :** नागाचे सर्वांत महत्त्वाचे आणि स्पष्ट ओळखण्याचे लक्षण म्हणजे त्याची ‘फणा’. जेव्हा नागाला धोक्याची जाणीव होते, तेव्हा तो आपल्या शरीराचा पुढचा भाग वर उचलतो आणि मानेची बरगडी पसरवून एक रुंद फणा तयार करतो. बहुतेक सामान्य किंवा विषारी नसलेल्या सापांना फणा नसतो. धोक्याची जाणीव झाल्यावर ते सहसा पळून जाण्याचा प्रयत्न करतात किंवा फुत्कारतात.

**नागाच्या फण्याच्या मागील बाजूची खूण :** भारतीय नागाच्या फण्याच्या मागील बाजूस एक विशिष्ट पांढरी खूण असते, जी ‘U’ अक्षराच्या आकाराची असते. दुसरीकडे, किंग कोब्राच्या फण्यावर ‘V’ अक्षराच्या आकाराची खूण असते.

**डोक्याचा आकार आणि रचना :** फणा काढल्यानंतर नागाचे डोके सपाट आणि रुंद दिसते; याउलट बहुतेक सामान्य सापांची डोकी अरुंद, गोलाकार किंवा दंडगोलाकार असतात.

**धोक्याची सूचना देणारे वर्तन :** धोका जाणवल्यास नाग आपल्या शरीराचा पुढचा एक तृतीयांश भाग हवेत वर उचलतो आणि मोठ्या आवाजात जोरात फुत्कारतो.

**रंग आणि नक्षी :** भारतीय नागाचा रंग साधारणपणे काळा, गडद तपकिरी किंवा गडद पिवळसर असतो. त्यांच्या शरीराचा खालचा भाग (पोट) पांढरा किंवा फिकट पिवळ्या रंगाचा असतो.

**अचानक समोरासमोर आल्यास काय करावे?**

नाग वा कोणताही साप केवळ तेव्हाच हल्ला करतो जेव्हा त्याला वाटते की तुम्ही त्याला इजा पोहोचविणार आहात. किमान ५-६ फूट अंतर राखा आणि हळूहळू मागे या. सापाचा दंश होण्याच्या बहुतेक घटना साप पकडण्याच्या किंवा मारण्याच्या प्रयत्नादरम्यान घडतात. अशा वेळी त्वरित एखाद्या सर्पमित्राला किंवा वन विभागाला कळवा.

# औषधांपेक्षाही लाइफस्टाइल महत्त्वाची; रोज करा ‘ही’ ३ कामे, नेहमी किडनी राहील सुपर ॲक्टिव्ह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुम्ही दररोज भरपूर पाणी प्या. कारण ते शरीरातील जीवाणू बाहेर टाकण्यास मदत करते. दररोज किमान ८ ग्लास पाणी प्यायल्याने मूत्रपिंड निरोगी राहण्यास मदत होते.

### मद्य आणि कॉफी टाळा

तुमची जीवनशैली मूत्रपिंडाचे कार्य बिघडण्यास कारणीभूत ठरते. मूत्रपिंडांचे मुख्य कार्य हानिकारक विषारी पदार्थ काढून टाकणे आहे आणि मद्य, कॅफीनमुळे मूत्रपिंडाच्या कार्यावर अतिरिक्त ताण येतो.

### व्हिटॅमिन सी

व्हिटॅमिन सी एक शक्तिशाली अँटिऑक्सिडंट म्हणून काम करते, जे शरीरातील ऊतींचे ऑक्सिडेटिव्ह ताणापासून संरक्षण करते. यामुळे मूत्रपिंडाचे आरोग्य सुधारते.

### व्हिटॅमिन सी चे पदार्थ

व्हिटॅमिन सी भरपूर असलेल्या पदार्थांमध्ये लिंबूवर्गीय फळे, ढोबळी मिरची, काकडी, टोमॅटो, ब्रोकोली आणि मोड आलेले धान्य यांचा समावेश होतो.



### अजमोद

अजमोदाचा रस पोषक तत्वांनी परिपूर्ण असून मूत्रपिंडांसाठी फायदेशीर ठरतो. यामुळे लघवीची वारंवारता वाढते, ज्यामुळे किडनीला विषारी पदार्थ प्रभावीपणे बाहेर टाकण्यास मदत होते.

### कॅनबेरी

कॅनबेरीचा रस मूत्रमार्गाच्या संसर्गावरही हा एक प्रभावी उपाय आहे. कॅनबेरीच्या रसाचे सेवन केल्याने मूत्रपिंडाचे आरोग्य राखण्यास मदत होऊ शकते. कॅनबेरीमधील दाहक-विरोधी गुणधर्म किडनीमधील अंतर्गत सूज कमी करण्यास मदत करतात, ज्यामुळे किडनीचे कार्य सुरळीत चालते.

### सफरचंद

सफरचंदामधील उच्च आम्ल प्रमाण मूत्रपिंडांना मूत्राची आम्लता राखण्यास मदत करते, ज्यामुळे पुढील जीवाणूंची वाढ रोखली जाते. सफरचंदामधील दाहशामक गुणधर्म मूत्रपिंडाच्या संसर्गानंतर मूत्रपिंडांना प्रभावीपणे बरे होण्यास मदत करतात.



# आग्रा आणि बऱ्हाणपूरचा ताजमहाल सेम टू सेम!

## दोघांची कहाणी मात्र खूपच वेगळी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रेमाचे प्रतीक मानले जाणारे ताजमहाल पाहण्याची प्रत्येकाची इच्छा असते. अशात जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेल्या ताजमहालसारख्या भव्य घरात कोणाला राहायला आवडणार नाही... तर आग्रा आणि बऱ्हाणपूर येथील ताजमहाल दिसायला अगदी सेम टू सेम असले, तरी दोघांची कहाणी मात्र फार वेगळी आहे. आग्राच्या ताजमहालचा प्रत्येक कोपरा पांढरा शुभ्र आणि आकर्षक आहे. प्रेमाचे प्रतीक असलेले ताजमहाल पाहण्यासाठी लाखो पर्यटक रोज गर्दी करतात.

पण आता चर्चा रंगली आहे बऱ्हाणपूरच्या ताजमहालाची. बऱ्हाणपूर येथील ताजमहाल एका पतीने पत्नीवर असलेल्या प्रेमाखातर तयार केला आहे. सध्या बऱ्हाणपूरच्या ताजमहालाचे काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहते. त्यामुळे या ताजमहालाची चर्चा सर्वत्र रंगली आहे. इतिहासात शाहजहानने मुमताजसाठी ताजमहाल बांधला होता. तर २०२५ मध्ये बऱ्हाणपूर येथील आनंद प्रकाश चौकसे यांनी त्यांच्या पत्नीसाठी ताजमहालासारखेच एक भव्य घर बांधून प्रेमाचे एक नवीन उदाहरण निर्माण केले आहे. आनंद चौकसे यांच्या पत्नी एकदा म्हणाल्या, की ताजमहाल किती सुंदर आहे. पत्नी फक्त बोलली, पण आनंद यांनी पत्नीची मोठी इच्छा पूर्ण केली. सांगायचे झाले तर २०२१ मध्ये महाल बांधण्यास सुरूवात झाली आणि २०२५ मध्ये महाल पूर्ण झाला. जे सेम टू सेम ताजमहालासारखे आहे. नुकतेच एका कंटेंट क्रिएटरने महालाचा संपूर्ण व्हिडिओ शूट केला आहे. या पोस्टवर अनेक नेटकऱ्यांनी लाईक्स आणि कमेंटचा वर्षाव केला आहे. तर अनेकांनी आनंद यांचे कौतुक केले आहे. ताजमहाल हे शाहजहानच्या प्रेमाचे प्रतीक होते. तर बऱ्हाणपूरचा ताजमहाल हे आनंद यांच्या प्रेमाचे उदाहरण आहे. हे घर फक्त विटा आणि दगडांचे नाही तर खऱ्या प्रेमाचा पुरावा आहे. आनंद प्रकाश चौकसे यांनी घराचा प्रत्येक कोपरा प्रेमाने सजवला आहे.





# श्री मंगळग्रह आपली चाल बदलणार!

## हे नक्षत्र परिवर्तन कोणत्या राशीच्या लोकांना लाभणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ग्रहांची चाल बदलणे हे ज्योतिषशास्त्रात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. ग्रहाचे राशी परिवर्तन आणि तसेच त्यांचे नक्षत्र परिवर्तन हे त्या राशीच्या लोकांच्या जीवनावर प्रभाव पाडतात, अशी धारणा आहे. सप्टेंबरच्या सुरूवातीलाच असे एक मोठे नक्षत्र परिवर्तन होणार आहे. मंगळ नक्षत्र परिवर्तन होणार आहे. मंगळ, २ सप्टेंबर २०२६ ला गुरूचे स्वामित्व असलेल्या पुनर्वसू नक्षत्रात प्रवेश करणार आहे. २४ सप्टेंबर २०२६ पर्यंत मंगळ या नक्षत्रात विराजमान असणार आहे. त्यामुळे श्री मंगळग्रह आणि गुरू यांची ही स्थिती काही राशींना अत्यंत लाभदायक ठरण्याची शक्यता आहे. या काळात करिअर, संपत्ती, उद्योग याबाबत लाभकारक योग निर्माण होण्याची शक्यता आहे.



**मेष :** मंगळाचे नक्षत्र परिवर्तन मेष राशीच्या लोकांना आर्थिक स्वरूपात चांगला काळ घेऊन येण्याची शक्यता आहे. अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे. व्यवसाय करणाऱ्या लोकांना विस्ताराची संधी मिळणार आहे. नोकरी करणाऱ्या लोकांना देखील आपल्या कामात यश मिळेल. कुटुंबाकडून देखील एक चांगली बातमी मिळू शकते. अनेक दिवसांपासून प्रयत्न करत असलेल्या कामात सकारात्मक रिझल्ट मिळतील.

**कर्क :** या राशीच्या लोकांना मंगळाचे हे नक्षत्र परिवर्तन अनेक गोष्टीत लाभ देणार आहे. कुटुंबाशी निगडीत जुनी समस्या सुटेल. पितृत संपत्तीशी निगडीत लाभ मिळू शकतो. जमीन, घर किंवा वाहन खरेदाचा योग आहे. करिअरमध्ये कोणत्या तरी प्रभावशाली व्यक्तीचा सहयोग मिळेल.

**वृश्चिक :** या राशीच्या लोकांना मंगळ नक्षत्र परिवर्तन यशाचे मार्ग खुले करून देण्याची शक्यता आहे. कार्यक्षेत्रात येणाऱ्या अडचणी कमी होऊ शकतात. नोकरी करणाऱ्या लोकांना नवीन जबाबदारी मिळण्याचा योग देखील आहे. अधिकाऱ्यांकडून तुमच्या कामाच्या स्तुती होऊ शकते. आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ शकते.

**धनू :** या राशीच्या लोकांना हा काळ शुभ असणार आहे. कोणत्यातरी महत्वाच्या कामात यश मिळण्याची शक्यता आहे. जोडीदार आणि कुटुंबाकडून चांगले सहकार्य लाभणार आहे. पैशाशी निगडीत प्रकरणात स्थिती पहिल्यापेक्षा चांगली होऊ शकते. गुंतवणूकीच्या नव्या संधी मिळतील. दीर्घकाळापासून अडकलेला पैसा परत मिळाल्यामुळं दिलासा मिळेल.

**मीन :** मंगळग्रहाचे पुनर्वसू नत्रात जाण्याने मीन राशीच्या लोकांवर याचा सकारात्मक प्रभाव पडणार आहे. व्यवसायात विस्ताराची संधी मिळणार आहे. कामकाजात येणारे अडथळे जूर होण्याने मानसिक तणाव कमी होणार आहे. नोकरी आणि रोजगाराशी निगडीत प्रकरणात देखील यश मिळण्याचा योग आहे. याकाळात खास व्यक्तीची ओळख देखील आपल्यासाठी फायदेशीर ठरू शकते. ज्योतिषशास्त्रात मंगळ ग्रह हा साहस, ऊर्जा, जमीन, संपत्ती आणि पराक्रम याच्याशी निगडीत मानला जातो. तर पुनर्वसू नक्षत्राचा स्वामी ग्रह गुरू आहे. मंगळ पुनर्वसू नत्रज्ञात आल्यामुळे काही राशींसाठी ही नवी सुरूवात आणि प्रगतीचा काळ असणार आहे.



# श्रावण मंगळवार आणि हनुमानजी : एक अद्भुत धार्मिक योग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हनुमानजी हे भगवान शंकर यांचेच ११ वे रुद्र अवतार मानले जातात. त्यामुळे संपूर्ण श्रावण महिन्यात शिवजींच्या आराधनेसोबतच हनुमानजींची पूजा केल्याने शिवजी आणि हनुमानजी या दोघांचीही दुहेरी कृपा प्राप्त होते. मंगळवार हा दिवस हनुमानजींच्या शौर्य, ऊर्जा आणि भक्तीशी संबंधित आहे. जेव्हा श्रावणातील पवित्र मंगळवारी हनुमानजींची उपासना केली जाते तेव्हा तिचे फळ कैक पटीने वाढते.

**तिसऱ्या मंगळवाराचे आध्यात्मिक महत्त्व (१ सप्टेंबर २०२६)**

**मंगळ दोषापासून मुक्ती :** ज्यांच्या कुंडलीत मंगळ दोष आहे किंवा भूत-प्रेत बाधा, नकारात्मक ऊर्जा त्रास देत आहे त्यांनी या दिवशी हनुमानजींची विशेष पूजा करावी.

**संकट निवारण :** श्रावणातील तिसऱ्या मंगळवारी घेतलेला हनुमानजींचा वसा जीवनातील सर्व मोठी संकटे, विवंचना आणि आजारपण दूर करतो.

**बल आणि बुद्धीची प्राप्ती :** हनुमानजी हे 'बल-बुद्धी-विद्या' देणारे दैवत आहेत. विद्यार्थ्यांसाठी आणि तरुणांसाठी या दिवशी केलेली उपासना अत्यंत फलदायी ठरते.

**या दिवशी कशी करावी हनुमानजींची पूजा? (पूजा विधी व उपाय)**

श्रावणातील तिसऱ्या मंगळवारी हनुमानजींना प्रसन्न करण्यासाठी खालील विधी व उपाय आवर्जून करावेत.

**सिंदूर आणि तेलाचा दिवा :** हनुमानजींच्या मूर्तीला किंवा फोटोला चमेलीचे तेल आणि शेंदूर (सिंदूर) अर्पण करावा. त्यांच्यासमोर गाईच्या तुपाचा किंवा तिळाच्या तेलाचा दिवा लावावा.

**हनुमान चालीसा पठण :** या दिवशी सकाळी किंवा सायंकाळी स्वच्छ आसनावर बसून ११ वेळा हनुमान चालीसा किंवा 'बजरंग बाण' चा पाठ करावा.

**विशेष नैवेद्य :** हनुमानजींना गूळ-शेंगदाणे, बुंदीचे लाडू किंवा चण्याच्या डाळीचा नैवेद्य दाखवावा.

**राम नामाचा जप :** हनुमानजी हे प्रभू श्रीरामांचे परम भक्त आहेत. त्यामुळे ज्या ठिकाणी श्रीराम नामाचा जयघोष होतो तेथे हनुमानजी सदैव वास करतात. या दिवशी 'श्री राम जय राम जय जय राम' या मंत्राचा जप करावा. सुख-समृद्धीसाठी विशेष संदेश १ सप्टेंबर २०२६ चा हा श्रावण मंगळवार भक्तांना ऊर्जा आणि सकारात्मकता देणारा ठरेल. या दिवशी केवळ उपवास न करता मनातील नकारात्मक विचारांचा त्याग करून संकटांशी लढण्याची ताकद हनुमानजींकडे मागावी. 'भीमरूपी महारुद्रा' चे स्मरण करून केलेली ही भक्ती नक्कीच जीवनात सुख, शांती आणि समृद्धी घेऊन येईल.

# सप्टेंबरच्या सुरूवातीलाच 'शुक्र'चे संक्रमण


## १, २ नव्हे, तब्बल ७ राशींचा सुवर्णकाळ होणार सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार ग्रहांच्या संक्रमणाच्या दृष्टीने सप्टेंबर २०२६ या महिन्याची सुरूवात फार खास असणार आहे. या महिन्यात शुक्र ग्रह आपल्याच राशीत म्हणजेच तूळ राशीत प्रवेश करणार आहे. ज्योतिषशास्त्रानुसार शुक्र ग्रहाला सुख-सुविधा, प्रेम, धनसंपत्ती, सौंदर्य आणि भौतिक सुखाचा कारक ग्रह मानतात. अशातच शुक्राचे तूळ राशीत होणारे संक्रमण अनेक राशींसाठी आर्थिक आणि वैयक्तिक जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे असणार आहे.

शुक्र ग्रह दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजून ५१ मिनिटांनी तूळ राशीत प्रवेश करणार आहे. तर, ६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत तो याच राशीत असणार आहे. शुक्र ग्रहाचे आपल्याच राशीत होणारे संक्रमण फार महत्त्वाचे मानले जाणार आहे. त्यामुळे या लकी राशी कोणत्या आहेत ते जाणून घेऊया.

**मेष :** या राशीच्या लोकांसाठी शुक्राचे संक्रमण करिअर आणि आर्थिक बाबतीत लाभदायी ठरणार आहे. या काळात नोकरदार वर्गातील लोकांना नोकरीत प्रमोशन मिळण्याची शक्यता आहे. तसेच, काही नवीन जबाबदाऱ्या तुमच्यावर सोपवण्यात येतील. जर तुम्ही नोकरी बदलीचा विचार करत असाल तर त्यासाठी हा काळ चांगला आहे. वैवाहिक जीवनात गोडवा राहील.



**कर्क :** या राशीसाठी शुक्राचे हे संक्रमण सकारात्मक ठरणार आहे. या काळात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा तुम्हाला चांगला सपोर्ट मिळेल. नवीन प्रोजक्टवर काम करण्याची तुम्हाला संधी मिळेल. घरातील वातावरण आनंदी असेल. उत्पन्नाची नवीन साधनं निर्माण होतील.

**कन्या :** या राशीच्या लोकांसाठी शुक्र ग्रहाचं संक्रमण भाग्यशाली ठरणार आहे. या काळात तुमची आर्थिक स्थिती चांगली असेल. तसेच, अनेक दिवसांपासून रखडलेली कामे तुम्हाला लवकर करता येतील. तुमच्या प्रेम जीवनात तुम्हाला सकारात्मक परिणाम मिळतील. तणावापासून मुक्ती मिळेल.

**तूळ :** शुक्राचा प्रवेश तूळ राशीतच होणार आहे. त्यामुळे या राशीला विशेष लाभ मिळेल. या काळात तुमच्यातील आत्मविश्वास वाढेल. तुमच्या व्यक्तिमत्त्वात चांगले बदल दिसतील. तसेच वैवाहिक नात्यात गोडवा टिकून राहील. तुमच्या धनसंपत्ती भरभराट पाहायला मिळेल.

**कुंभ :** या राशीसाठी शुक्राचे संक्रमण आर्थिकदृष्ट्या भरभराटीचे असणार आहे. या काळात प्रगतीच्या अनेक नवीन संधी तुमच्यासमोर निर्माण होतील. तसेच जर तुम्हाला एखाद्या नवीन कार्याची सुरूवात करायची असेल तर त्यासाठी हा कालावधी योग्य ठरणार आहे.

**मकर :** या राशीच्या लोकांना शुक्र ग्रहाच्या संक्रमणाच्या दरम्यान करिअरमध्ये पुढे जाण्याची संधी मिळेल. एखाद्या नवीन प्रोजेक्टवर तुम्ही काम करु शकता. तसेच, तुमची अनेक रखडलेली कामे तुम्हाला या कालावधीत पूर्ण करता येतील. तुमचे पैसे एखाद्या मोठ्या वस्तूच्या खरेदीसाठी खर्च होऊ शकतात.

**धनू :** या राशीच्या लोकांसाठी शुक्र ग्रहाचे संक्रमण सकारात्मक ठरणार आहे. या काळात तुमच्यासाठी उत्पन्नाची नवीन साधने निर्माण होतील. जर तुम्हाला पैशांची गुंतवणूक करायची असेल तर त्यासाठी हा काळ योग्य असणार आहे. व्यवसायात तुम्हाला लाभ मिळेल.

# तुम्हाला 'हे' माहीत आहे का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अष्टविनायकांपैकी आठही गणेशमूर्ती स्वयंभू म्हणजेच स्वतः प्रकट झालेल्या मानल्या जातात.




**श्रीगणेशांची ८ पवित्र तीर्थक्षेत्रे**

* महाराष्ट्राच्या पावन भूमीत वसलेली अष्टविनायकांची आठ पवित्र स्थळे म्हणजे प्रत्येक गणेशभक्तासाठी श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक आनंदाचा अनमोल ठेवा.
* अष्टविनायक म्हणजे भगवान श्रीगणेशांची आठ स्वयंभू रूपे. प्रत्येक मंदिराची स्वतःची स्वतंत्र आख्यायिका, इतिहास आणि विशेष महत्त्व आहे.

**१) श्री मयूरेश्वर मंदिर (मोरगाव) :** भगवान श्रीगणेशांनी याच ठिकाणी सिंधू राक्षसाचा वध केला, अशी आख्यायिका आहे. येथे गणेशमूर्ती मोरावर आरूढ रूपात असून सोंड डावीकडे वळलेली आहे. देवी रिद्धी व सिद्धी त्यांच्यासोबत विराजमान आहेत. अष्टविनायक यात्रेचा पारंपरिक प्रारंभ आणि समारोप मोरगाव येथे केला जातो.

**२) श्री सिद्धिविनायक मंदिर (सिद्धटेक) :** अष्टविनायकांमधील हे दुसरे तीर्थक्षेत्र. येथील मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे सोंड उजवीकडे वळलेली आहे.

**३) श्री बल्लाळेश्वर मंदिर (पाली) :** परमभक्त बल्लाळाच्या भक्तीने प्रसन्न होऊन भगवान श्रीगणेशांनी त्याचे संकटातून रक्षण केले. येथील मूर्ती सिंहासनावर विराजमान असून तिची सोंड डावीकडे वळलेली आहे.

**४) श्री वरदविनायक मंदिर (खोपोली) :** भक्तांना वरदान, सुख-समृद्धी आणि यश प्रदान करणारे वरदविनायक येथे विराजमान आहेत. येथील मूर्ती शेजारील तलावात सापडल्याचे मानले जाते.

**५) श्री चिंतामणी मंदिर (थेऊर) :** भगवान श्रीगणेशांनी चिंतामणी नावाचा अमूल्य मणी परत मिळवून दिला, अशी आख्यायिका आहे. म्हणूनच ते चिंतामणी या नावाने प्रसिद्ध आहेत.

**६) श्री गिरिजात्मज मंदिर (लेण्याद्री) :** पार्वती मातेने श्रीगणेशांना पुत्ररूपात प्राप्त करण्यासाठी येथे तपश्चर्या केली. म्हणून श्रीगणेशांना गिरिजात्मज गिरिजा मातेचा पुत्र असे संबोधले जाते.

**७) श्री विघ्नेश्वर मंदिर (ओझर) :** भगवान श्रीगणेशांनी भक्तांचे रक्षण करण्यासाठी विघ्नासुराचा पराभव केला. त्यामुळे त्यांना विघ्नेश्वर हे नाव प्राप्त झाले.

**८) श्री महागणपती मंदिर (रांजणगाव) :** येथील महागणपती पूर्वाभिमुख असून कमळावर विराजमान आहेत. त्यांच्या दोन्ही बाजूंना देवी रिद्धी व देवी सिद्धी विराजमान आहेत.

**अष्टविनायक यात्रेचा पारंपरिक क्रम :** १) मोरगाव २) सिद्धटेक ३) पाली ४) महड ५) थेऊर ६) लेण्याद्री ७) ओझर ८) रांजणगाव पुन्हा मोरगाव.



**आठ रूपे, आठ आख्यायिका, पण भक्ती एकच :** श्रीगणेशांवरील अखंड श्रद्धा, अष्टविनायक दर्शन म्हणजे केवळ तीर्थयात्रा नव्हे; तर श्रद्धा, भक्ती आणि आत्मिक समाधानाचा सुंदर प्रवास आहे.

**। ॐ गं गणपतये नमः ।**

# श्रीगणेशांचे पूर्ण पीठ : श्रीक्षेत्र पद्मालय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व कथन करणाऱ्या भगवान श्रीगणेशांच्या साडेतीन पीठांपैकी पूर्ण पीठ असलेल्या श्रीक्षेत्र पद्मालय (ता. एरंडोल, जि. जळगाव) येथील अतिप्राचीन डाव्या आणि उजव्या सोंडेच्या स्वयंभू श्रीगणेशमूर्ती भक्तांचे श्रद्धास्थान आहेत. पद्मालय येथील ही श्रीगणेश मूर्ती स्वयंभू आहे. पद्म + आलय; पद्म = कमळ, आलय = निवास (घर).

**श्रीक्षेत्र पद्मालय (कमळाचे घर)**

श्रीक्षेत्र पद्मालय हे जळगावपासून सुमारे ३० किलोमीटरवर स्थित आहे. 'पद्मालय' हा शब्द 'पद्म' आणि 'आलय' या दोन शब्दांचा मिलाफ आहे, जो संस्कृतमध्ये कमळाचे घर आहे. हे मंदिराच्या जवळ कमळ तलाव असलेले भगवान श्रीगणेशांना समर्पित आहे. पद्मालय मंदिर भारतातील गणपतींच्या साडेतीन पीठांमध्ये येते. हे मंदिर पूर्ण पीठ म्हणून सन्मानित आहे. मंदिरामध्ये दोन स्वयंभू दोन गणेशमूर्ती आहेत. आमोद आणि प्रमोद. या दोन्ही मूर्तींमध्ये प्रवाळ आहेत आणि त्यांच्या उजव्या कवटीचे त्रिशंकण उजवीकडे आहे आणि दुसरा एक डाव्या बाजूला आहे. दोन्ही मूर्ती स्वयंभू आहेत. हे मंदिर दगडांच्या आतील बाजूस बनले आहे. हा तलाव कमळाच्या फुलांनी भरलेला होता. त्यामुळे मंदिराला 'पद्मालय' असे म्हटले जाते.

जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यात निसर्गरम्य परिसर असलेल्या पद्मालय या पवित्र क्षेत्री असलेले श्रीगणेश मंदिर सुप्रसिद्ध आहे. या मंदिरातील मूर्ती शंभराहून अधिक वर्षांपूर्वी मंदिराजवळ असलेल्या तळ्यात मिळाल्या. श्रीगणेश पुराणाच्या उपासना खंडातील ७३, ७४, ९० आणि ९१ व्या अध्यायात श्रीक्षेत्र पद्मालय संस्थानातील स्वयंभू श्रीगणेश मूर्तीचा उल्लेख आढळतो. साडेतीन गणेश पीठांपैकी श्रीक्षेत्र पद्मालय पूर्ण पीठ आहे. मोरगाव, राजूर, पद्मालय हे पूर्ण, तर चिंचवड हे अर्धपीठ असल्याचा उल्लेख आढळतो. थोर संत सद्गुरू श्री गोविंद महाराज शास्त्री बर्वे यांनी शके १८२५ (वर्ष १९०३) मध्ये पद्मालय येथील मंदिराचा जीर्णोद्धार केला. हे मंदिर पूर्वीच्या काशी विश्वेश्वरांच्या मंदिराची प्रतिकृती आहे. या मंदिरात डाव्या आणि उजव्या सोंडेच्या अशा दोन श्रीगणेश मूर्ती आहेत. त्या कशा अवतरल्या त्यासंदर्भातील माहिती पुराणांमध्ये आढळते.



**डाव्या सोंडेच्या गणपतीसंदर्भात इतिहास**

समुद्रमंथनातून निघालेले हलाहल विष भगवान शंकर यांनी प्राशन केल्यावर त्यांच्या शरीराची आग होऊ लागली. त्यावेळी गळ्यात शेषनागाला धारण केल्याने महादेवांच्या शरीराची आग शांत झाली; परंतु शेषनागास गर्व झाला, की माझ्या सान्निध्यामुळे महादेवांना बरे वाटू लागले. महादेवांना हे समजले. त्यांनी शेषाला जमिनीवर फेकले. त्यावेळी शेष पद्मालयक्षेत्री येऊन पडले. शेषनाग दुःखाने फुत्कारू लागले. त्यांचा आवाज ऐकून नारदमुनी त्यांच्याजवळ आले. त्यांनी शेषाला पंचाक्षरी श्रीगणेशांचा मंत्र दिला. त्यांच्या तपोबळाने १२ वर्षांनंतर डाव्या सोंडेच्या आकारात प्रवाळयुक्त गजाननांनी शेषनागाला दर्शन दिले आणि पृथ्वीचा भार चांगल्या रीतीने सांभाळता यावा, अशी शक्ती दिली. आपल्या पिताश्रींना (अर्थात् महादेवांना) पुन्हा शेषाला गळ्यात धारण करण्याची विनंती केली. 'माझी मनोकामना जशी पूर्ण केली, तसेच येथे येणाऱ्या भक्तांची मनोकामना पूर्ण करण्यासाठी आपण येथे थांबावे', अशी शेषनागांनी श्रीगणेशांना विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन आजही डाव्या सोंडेचा गणपती पद्मालय येथे वास्तव्य करून आहे.

**उजव्या सोंडेच्या गणपतीचा इतिहास**

परशुराम अवताराच्या काळात या प्रदेशात 'कार्तवीर्य' नावाचा राजा होऊन गेला. त्याला मूल नव्हते. तो दत्तात्रयांचा भक्त होता. श्री दत्तांनी पुत्रप्राप्तीसाठी त्याला संकष्टी चतुर्थीचे व्रत करण्यास सांगितले. एका चतुर्थीस कृतवीर्य पूजा करत असताना त्याला जांभई आली. त्यावेळी त्याने आचमन न करता पूजाविधी तसाच चालू ठेवला. या चुकीमुळे राणीला हात-पाय नसलेला मुलगा झाला. त्याचे नाव 'कार्तवीर्य' ठेवले. त्या मुलाला १२ वर्षे सांभाळले. पुढे कार्तवीर्याला गुरुदत्तांनी १२ वर्षे श्रीगणेशांचा बीजमंत्राचा जप करण्यास सांगितले. पद्मालयाच्या याच तलावासमोर कार्तवीर्याने तपश्चर्या केली. या तलावातून प्रवाळयुक्त गजाननांनी दर्शन दिले. गजाननांनी कार्तवीर्याला स्पर्श केल्यावर त्याचे सहस्र हात आणि दोन पाय तयार झाले. त्याचे नाव 'सहस्रार्जुन' ठेवले. त्याने सहस्र हातांनी श्रींना येथेच थांबण्याची विनंती केली. विनंतीला मान देऊन उजव्या सोंडेचे श्री गणपती त्याच स्थितीत येथे थांबलेले आहेत. मंदिरातील उंदराच्या २ हातांना असलेली १४ बोटे हे १४ सिद्धींचे प्रतीक आहे. पद्मालय येथील अतिप्राचीन डाव्या आणि उजव्या सोंडेच्या स्वयंभू श्रीगणेश मूर्ती. या श्रीगणरायांनी ज्याप्रकारे शेषनाग आणि कार्तवीर्य यांच्या मनोकामना पूर्ण केल्या त्याप्रमाणे आपल्या सर्वांच्या सर्व मनोकामना श्रीगणेश कृपेने पूर्ण होवोत.

**। जय गजानन!।**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)